29/3/14
Library

Fybmm (M)
Eff. Comm. Skills

MN3ACN

वेळ - २ तास गुण - ६०

सूचना : १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील संख्या गुण दर्शवितात.

---

प्र.१. पुढे दिलेल्या विषयावर आकाशवाणीसाठी जाहिरातीचा मसुदा तयार करा. (०८)

उत्पादन - केशतेल (हेअर ऑईल) नाव : शक्ती

उत्पादक : शक्ती ऑईल मिल्स, जळगाव

जाहिरातीची वेळ - १५ सेकंद

ब) पुढे दिलेल्या विषयावर वृत्तपत्रासाठी जाहिरात तयार करा. (०७)

ठाणे येथे नवीन सुरु होणारे इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे शोरुम

प्र.२ अ.) 'मराठी भाषा दिनानिमित्त मराठी वाङःमय मंडळातर्फे आयोजित कार्यक्रमा साठी भाषण तयार करा. (०८)

ब) तुमच्या शहरातील खराब रस्त्याबद्दल प्रसिदध वृत्तपत्राच्या संपादकांना 'वाचकांचा पत्रव्यवहार या सदरासाठी पत्र लिहा (०७)

किंवा

प्र.२ अ) तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमासाठी भाषण तयार करा. (०८)

ब) वृत्तपत्रातील वाचकांच्या पत्रव्यवहार या सदरासाठी तुमच्या विभागातील पाणीटंचाईच्या समस्येबद्दल संपादकांना पत्र लिहा. (०७)

प्र.३) 'अंधश्रध्देची समस्या व निर्मूलन' या विषयावर ८०० शब्दांत निबंधलेखन करा. (१५)

किंवा

प्र.३) चित्रपटांचा समाजावरील परिणाम या विषयावर ८०० शब्दात निबंध लेखन करा. (१५)

प्र.४ अ ) पुढे दिलेल्या उताऱ्याचे हिंदी किंवा इंग्रजी भाषेत भाषांतर करा. (०८)

जाहिरातींचे प्रस्थ बोकाळल्याने सामान्य माणसाची प्रवृत्तीच बदलली आहे. आपण होऊन तो चांगले वाईट शोधतच नाही तर जाहिरात बघून त्या गोष्टीकडे तो वळतो व अनेकदा फसतो. त्यामुळे आपले जीवनच जाहिरातीने व्यापून टाकले आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जाहिरात शिरली आहे.एकदा जाहिरात वाचली किंवा ऐकली की ग्राहक ती वस्तु घेण्यास धावतो असे ही नाही. पण वारंवार त्याच्या समोर ती जाहिरात आली की, कालांतराने कुतूहलापोटी ती वस्तू तो आणण्याची शक्यता असते.

MN3ACN

**प्र.४ब)** पुढील उतारा संपादित करुन पुर्नलेखित करा.

भारतात खेड्यांना फारच महत्व आहे. कारण आपला भारतदेश खेड्यांचा देश आहे असे म्हटले तर फारसे चुक ठरणार नाहि. भारताच्या लोकसंख्येच्या ७० टक्के लोकसंख्या खेड्यातील आहे. ऊरलेले लोक शहरात राहेतात. स्वतत्र्यानंतर भारताने विकास कार्य सूरु केले आहे. आपले सरकार खेड्याच्या विकासचा सातत्याने विचार करीत अशते ही आनंदाची गोश्ट आहे. सरकारला या ग्रामीन जीवनाचा व लोकांचा विसर पडला नाही सुध्दा आनंदाची गोश्ट आहे.

**किंवा**

**प्र.४ अ )** पुढे दिलेल्या उताऱ्याचे हिंदी किंवा इंग्रजी भाषेत भाषांतर करा. (०८)

काही पुस्तकांचा केवळ स्वाद घ्यावयाचा असतो, तर इतर काहींचे ग्रहण करावयाचे असते. काही पुस्तेके चघळून आत्मसात करावयाची असतात. म्हणजेच काही पुस्तकांचा केवळ काही भागच वाचावयाचा. इतर सर्व वाचावयाची. परंतु जिज्ञासेशिवाय काही पुस्तके मात्र पूर्णपणे लक्षपूर्वक व व्यासंगपूर्णतने वाचावयाची असतात. काही पुस्तके प्रतिनिधीमार्फत वाचावीत. किंवा दुसऱ्यांनी काढलेल्या उताऱ्यांमार्फत वाचली तरी चालतात. वाचन माणसास पूर्णता आणते, सभा त्याला तत्पर बनवते : तर लेखन त्याला अचूक बनविते.

**प्र.४ब)** पुढील उतारा संपादित करुन पुर्नलेखित करा. (०७)

आपल्याला करावयास काहिच काम नसेल तर किती छाण होईल असे आपल्याला कदी कदी वाटते. ज्या श्रीमंत लोकांना उपजीविकेसाठी काहीच काम करावे लागत नाहि. त्यांचा आपणास किती हेवा वाटते ! त्यांना जेवढे आवडते तेवढंच काम ते वर्षभर करतात ! तथापी असे आपणास वाटते त्या वेळी आपण चुक करत असाते. कधी कधी आपल्याला वाटतात तितकी श्रीमंत माणुस सुखी नवसतात. कारण काहीच करावयास नसल्याने ते कंटाळलेले असतात,